सांस्कृतिक कार्य संचालनालय
महाराष्ट्र शासन
- 7 FEB 2013
आवक क्रमांक 128
विभाग

**भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन ही नवीन योजना सुरु करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**शासन निर्णय क्र. रासांधो २०१०/शासंप्रो २०११/प्र.क्र. ३०६/सां.का.४**
**दिनांक : ३० जानेवारी, २०१३**

**प्रस्तावना :-** राज्य शासनाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून राज्य सांस्कृतिक धोरण २०१० जाहीर केले असून या धोरणाची अंमलबजावणी दि. १ जुलै, २०१० च्या शासन निर्णयान्वये सुरु केली आहे. सदर धोरणातील निर्णयानुसार शास्त्रीय संगीतास प्रोत्साहन देण्यासाठी भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या नांवे नवीन योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या नांवे शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना सुरु करताना, पंडित भीमसेन जोशी यांचे कार्यक्षेत्र विचारात घेऊन शास्त्रीय गायन व वादन या २ क्षेत्रांचा या योजनेअंतर्गत विचार करण्यात आला असून त्यानुसार सदर नवीन योजनेअंतर्गत खालील ४ उपक्रमांची अंमलबजावणी करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१. भारतरत्न पं.भीमसेन जोशी युवा शिष्यवृत्ती योजना
२. भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत महोत्सव
३. भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार
४. भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीतातील नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान

सदर ४ उपक्रमांची सविस्तर रुपरेषा खालीप्रमाणे आहे.

**१. भारतरत्न पं. भीमसेन जोशी युवा शिष्यवृत्ती योजना :-** या योजनेंतर्गत शास्त्रीय संगीतामध्ये शिक्षण घेणा-या हुशार व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देवून त्याच्या कलेच्या शिक्षणास मदत करण्यात येईल.

१) **शिक्षणाचे स्वरुप :-** भारतीय शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेणारा विद्यार्थीवर्ग

२) **शिष्यवृत्तीसाठी पात्रता :-** भारतीय शास्त्रीय संगीतात पदवीचे शिक्षण घेतल्यानंतर संगीतातील पुढील उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देण्यात येईल. त्यासाठी विद्यार्थ्याने खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१) मान्यताप्राप्त विद्यापीठाचे पदवीचे प्रमाणपत्र.
२) पदवीपर्यंतच्या शिक्षणातील ३ वर्षाचे गुणवत्ता प्रमाणपत्र.
३) घ्यावयाच्या उच्चशिक्षणाबाबतची माहिती व कागदपत्रे
४) कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र

३) **शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थि संख्या :-** शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेणारे एकूण १२ विद्यार्थी (**शास्त्रीय गायनाचे** शिक्षण घेणारे ६, **शास्त्रीय वादनाचे** शिक्षण घेणारे ६ असे एकूण १२ विद्यार्थी)

४) **शिष्यवृत्तीची रक्कम :-** प्रत्येक विद्यार्थ्यांस दरमहा रु.५,०००/- या प्रमाणे २ वर्षासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

५) **शिष्यवृत्तीसाठी निवड करणे :-** विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करताना जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात येतील व पात्र विद्यार्थ्यांची तज्ञ समितीकडून परिक्षा घेऊन त्यामधील गुणवत्तेनुसार व आर्थिक परिस्थितीनुसार योग्य विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.

६) **जाहिरातीद्वारे अर्ज मागविणे :-** सांस्कृतिक कार्य संचालनालयाने प्रतिवर्षी प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस म्हणजेच एप्रिल महिन्यात शिष्यवृत्तीसंदर्भात विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यासाठी प्रमुख वृत्तपत्रात व्यापक जाहिरात देण्याची कार्यवाही करावी.

७) **शिष्यवृत्तीबाबतचे अर्ज सादर करावयाचा कालावधी :-** वृत्तपत्रातील जाहिरातीनुसार विद्यार्थ्यांनी प्रत्येक आर्थिक वर्षाच्या मे महिन्याच्या अखेरपर्यंत सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये अर्ज सादर करावा. जाहिरातीत नमूद केलेल्या विहित मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जांचा शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाणार नाही. पुढील आर्थिक वर्षी शिष्यवृत्तीसाठी विहित मुदतीत नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे.

८) **अर्जांची छाननी :-** प्राप्त अर्जांची ठरविण्यात आलेल्या निकषानुसार छाननी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत करण्यात येईल.

९) **निवड समिती :-** निकषानुसार पात्र ठरणा-या विद्यार्थ्यांमधून १२ विद्यार्थ्यांची निवड करण्याबाबत शास्त्रीय संगीत क्षेत्रातील ४ तज्ञ व्यक्तींची एक निवड समिती गठीत करण्यात येत आहे. तज्ञ समितीची दर ३ वर्षांनी पुनर्रचना करण्यात येईल. सदर समितीमार्फत छाननीअंती पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची परिक्षा घेण्यात येऊन त्यांच्या गुणवत्तेनुसार १२ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड केली जाईल.

सदर नवीन योजनेअंतर्गत पहिल्या ३ वर्षासाठी (चालू आर्थिक वर्षातील केवळ २ महिने कालावधी शिल्लक असल्यामुळे ही समिती या आर्थिक वर्षासह पुढील ३ आर्थिक वर्ष म्हणजेच सन २०१५-१६ पर्यंत कार्यरत राहील) किंवा समितीच्या पुनर्रचनेचा पुढील शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत खालीलप्रमाणे तज्ञ समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. पं. प्रभाकर कारेकर | ३. पं. उल्हास बापट |
| २. श्रीमती चित्रा मोडक | ४. पं. सुरेश तळवळकर |

**टिप :-** शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्जातील पात्र विद्यार्थ्यांची परिक्षा घेण्यासाठी आवश्यकता भासल्यास त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीस विशेष मान्यवर म्हणून शासनाच्या अधिकारात निवड समितीच्या बैठकीसाठी आमंत्रित करण्यात येईल.

१०) **निवड समितीच्या बैठका :-** कोकण व पुणे या दोन महसूल विभागासाठी पुणे/मुंबई या एका ठिकाणी समितीमार्फत कलावंत निवडण्यासाठी बैठक आयोजित करण्यात येईल. अमरावती व नागपूर या दोन महसूल विभागासाठी अमरावती /नागपूर या एका ठिकाणी समितीमार्फत

कलावंत निवडण्यासाठी बैठक आयोजित करण्यात येईल. औरंगाबाद व नाशिक या दोन महसूल विभागासाठी औरंगाबाद /नाशिक या एका ठिकाणी समितीमार्फत कलावंत निवडण्यासाठी बैठक आयोजित करण्यात येईल. त्यामुळे किमान ३ बैठका आयोजित करणे आवश्यक आहे. मात्र छाननी अंती अधिक कलावंत निकषामध्ये पात्र ठरल्यास एका बैठकीत सर्व कलावंतांची चाचणी घेऊन अंतिम कलावंताची निवड करणे शक्य होणार नाही. अशा वेळी एका वेळी दोन दिवसासाठी बैठक आयोजित करावी लागेल. त्यावेळी दैनिकभत्ता दोन दिवसासाठी अदा करावा लागेल. या योजनेंतर्गत अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे आहे

| अ.क्र. | तपशील | अंदाजे रक्कम |
|---|---|---|
| १ | युवा शिष्यवृत्ती १२ विद्यार्थी<br>(रु.५०००/-प्रति विद्यार्थी x २४ महिने x १२ विद्यार्थी ) | रु. १४,४०,०००/- |
| २ | समिती सदस्य प्रवासखर्च<br>(रु.३०००/-प्रतिसदस्य x ४ सदस्य x ३ बैठका ) | रु. ३६,००० /- |
| ३ | समिती सदस्य निवास भत्ता<br>(रु.१०००/-प्रतिसदस्य x ४ सदस्य x ३ बैठका) | रु. १२,००० /- |
| ४ | समिती सदस्य दैनिक भत्ता / बैठक भत्ता<br>(रु.१०००/-प्रतिसदस्य x ४ सदस्य x ३ बैठका ६ दिवस) | रु. २४,०००/- |
| ५ | हॉल भाडे - रु.१२,०००/- x ६ दिवस | रु. ७२,०००/- |
| ६ | २ वेळा चहा / अल्पोपहार / २ वेळा भोजन खर्च<br>रु.१०००/- x ४ सदस्य x ६ दिवस | रु.२४,००० /- |
| ७ | ध्वनी व्यवस्था - रु.५,०००/- x ६ दिवस | रु. ३०,००० /- |
| ८ | अनुषंगिक स्टेशनरी | रु. १०,००० /- |
| ९ | किरकोळ खर्च | रु. २०,००० /- |
| | **एकूण खर्च** | **रु.१६,६८,०००/-** |

**टीप :-** विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित केलेल्या मान्यवरांचा प्रवासखर्च देखील अदा करण्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात येईल.

(११) निवड समितीने त्यांच्या बैठकीअंती पात्र ठरविलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा प्रस्ताव संचालनालयामार्फत शासन मान्यतेस्तव सादर करण्यात येईल. सदर प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येईल.

**<u>२. भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत महोत्सव :-</u>** सदर योजनेंतर्गत पं. भीमसेन जोशी यांच्या नावे दरवर्षी एका महसूली विभागात याप्रमाणे चक्रीय पध्दतीने सर्व महसूल विभागात २ दिवसाचा शास्त्रीय संगीत महोत्सव आयोजित करण्यात येईल. सदर महोत्सव हा दर वर्षी भारतरत्न पं.भीमसेन जोशी यांच्या जयंतीदिनी म्हणजेच दि. ४ फेब्रुवारी रोजी अथवा त्यांच्या स्मृतीदिनी म्हणजेच दिनांक २४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात येईल. एक दिवस दोन कलावंताच्या कार्यक्रमाची मैफिल याप्रमाणे २ दिवसासाठी एकूण ४ कलावंताना (शास्त्रीय गायन क्षेत्रातील २ कलावंत व शास्त्रीय वादन क्षेत्रातील २ कलावंत) आमंत्रित करण्यात येईल. यासाठी अपेक्षित अंदाजे खर्च खालीलप्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | अंदाजे रक्कम |
|---|---|---|
| १ | ४ कलावंतांचे मानधन (रु.५०,०००/-प्रति कलावंत ) | रु. २,००,०००/- |
| २ | कलावंतांच्या साथीदारांची बिदागी (रु.२०,००० x ४) | रु. ८०,००० /- |

| | | |
|---|---|---|
| ३ | कलावंत व त्यांचे साथीदार यांचा निवास खर्च (४ कलावंतांसाठी ४ स्वतंत्र खोल्या व त्यांचे प्रत्येकी ४ साथीदार मिळून अंदाजे १६ व्यक्तींसाठी २ साथिदारांसाठी १ खोली याप्रमाणे ८ खोल्या) (रु.१५००/-प्रतिखोली भाडे x ६ खोल्या x २ दिवस ) | रु. १८,००० /- |
| ४ | कलावंत व त्यांचे साथीदार यांचा चहा/अल्पोपार /भोजन खर्च | रु. ५०,०००/- |
| ५ | आयोजन खर्च | रु. ६,००,००० /- |
| | **एकूण खर्च** | **रु.९,४८,०००/-** |

सदर खर्च अंदाजित असून महोत्सवाच्या आयोजनाच्या वेळी संचालनालयाकडून सादर होणा-या खर्चाच्या प्रस्तावानुसार आवश्यक ती तरतूद महोत्सव आयोजनासाठी करण्यात येईल.

**३) भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार :-** या उपक्रमांतर्गत भारतरत्न पं.भीमसेन जोशी यांच्या नावे शास्त्रीय संगीतात (शास्त्रीय गायन व वादन) प्रदीर्घ काळ उल्लेखनिय कार्य करणाऱ्या कलावंतास जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल. पुरस्काराची रक्कम रु.५.०० लाख इतकी असेल. सदर पुरस्कार प्रदान सोहळा हा दरवर्षी उपक्रम क्र.२ येथिल महोत्सवाच्या वेळेस आयोजित करण्यात येईल. त्यासाठी पुरस्कारार्थी व्यक्तीचे मानपत्र, स्मृतीचिन्ह, प्रवासखर्च, निवास खर्च व इतर अनुषंगिक खर्च यासाठी रु. २.०० लाख इतकी तरतूद ठेवण्यात यावी. त्यानुसार एकूण अपेक्षित अंदाजे खर्च रु.७.०० लाख इतका आहे. याशिवाय पुरस्कार प्रदान सोहळयाच्यावेळी तज्ञ समितीच्या सदस्यांना तसेच विशेष निमंत्रितांना आमंत्रित करणे आवश्यक असून तज्ञ समितीच्या सदस्यांना तसेच विशेष निमंत्रितांना रेल्वेच्या २ टायर एसीच्या तिकिटाच्या दराने प्रवासखर्च अदा करण्यात यावा. तसेच त्यांच्या निवास व भोजनाची व्यवस्था करण्यासाठी होणा-या खर्चासाठी आवश्यक ती तरतूद त्या-त्या वेळी करण्यात येईल.

तसेच सदर जीवन गौरव पुरस्कारासाठी मान्यवर कलाकाराची निवड करण्याकरीता खालीलप्रमाणे **भारतरत्न पंडित भीमसेन जोशी जीवनगौरव पुरस्कार निवड समिती** गठीत करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**शासकीय सदस्य**
१) मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य - अध्यक्ष
२) मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य - सदस्य
३) प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य - सदस्य
४) संचालक, सांस्कृतिक कार्य - सदस्य सचिव

**अशासकीय सदस्य :** उपक्रम क्र.१ येथे गठीत करण्यात येणा-या समितीचे सदस्य हेच या ठिकाणी अशासकीय सदस्य म्हणून ही काम करतील आणि सदर समितीच्या बैठकीसाठी या क्षेत्रातील २ तज्ञ / समीक्षक व्यक्तींना विशेष निमंत्रित म्हणून बोलविण्याचे अधिकार शासनास असतील.

सदर पुरस्कारासाठी विभागीय आयुक्त कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालय यांनी त्यांच्या क्षेत्रातील शास्त्रीय संगीतातील ज्येष्ठ व मान्यवर कलांवतांच्या नावांच्या शिफारशी प्रत्येक वर्षी माहे, डिसेंबर अखेरपर्यंत शासनास पाठवाव्यात. जेणेकरुन अन्य प्राप्त शिफारशींसोबत त्याही विचारात घेतल्या जातील.

**४) भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत क्षेत्रातील नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान :-** या योजनेंतर्गत प्रायोगिक तत्वावर दरवर्षी प्रत्येक महसूली विभागामधील एक याप्रमाणे कमाल ६ शास्त्रीय संगीतातील नोंदणीकृत संस्थांना रु.२.०० लाख/प्रतिसंस्था याप्रमाणे अनुदान देण्यात येईल.

**शास्त्रीय संगीत क्षेत्रातील नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान देण्याबाबतची नियमावली खालीलप्रमाणे असेल.**

१) संस्था पूर्णत: शास्त्रीय संगीतक्षेत्रात कार्य करणारी असावी.

२) संस्था नोंदणी अधिनियम आणि सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणीकृत असली पाहिजे.

३) संस्था या क्षेत्रात किमान १० वर्ष काम करणारी असावी.

४) संस्था शास्त्रीय संगीताचे विविध कार्यक्रम वर्षभर सादर करत असावी.

५) संस्था शास्त्रीय संगीताच्या जतन व संवर्धनाचे काम करत असल्यास त्या संस्थेस अनुदानासाठी प्राधान्य देण्यात येईल.

६) संस्थेच्या दरवर्षीच्या हिशोबाची तपासणी धर्मदाय आयुक्तांनी मान्यता दिलेल्या किंवा संमत्ती दिलेल्या परिक्षकाकडून किंवा सनदी लेखापालाकडून (चार्टर्ड अकाऊंटंट) करण्यात यावी. मागील३ आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणाच्या अहवालाच्या प्रतीत खालील बाबी नमूद केलेल्या असणे आवश्यक आहे.

अ) नफा/तोटा पत्रक

ब) जमा व खर्च लेखे

क) ताळेबंद

ड) सांस्कृतिक कार्यक्रमावर केलेल्या खर्चाच्या बाबींचा तपशील

इ) सनदी लेखापालांचे लेखा परिक्षणात्मक अहवाल

७) संस्थेस एकदा अनुदान मिळाल्यानंतर पुढील चार वर्ष सदर संस्था या अनुदानासाठी पात्र राहणार नाही.

८) संस्थांनी मागील ३ वर्षात केलेल्या कार्याचा आढावा घेऊनच या योजनेअंतर्गत त्यांना प्रोत्साहन म्हणून शासनाकडून अनुदान देण्यात येत असल्यामुळे या अनुदानासाठी संस्थांकडून उपयोगिता प्रमाणपत्र मागविण्याची आवश्यकता नाही.

९) ज्या कार्यक्रमासाठी अनुदानाची मागणी करण्यात येईल, ते कार्यक्रम संस्थेने जनतेसाठी विनामुल्य आयोजित करणे आवश्यक आहे.

१०) संस्थांनी चुकीची कागदपत्रे सादर करुन सहाय्यक अनुदान प्राप्त केल्याचे आढळून आल्यास सदर संस्था भविष्यात शासनाच्या अनुदानासाठी कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल. तसेच सदर संस्थेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात कार्य करणा-या नोंदणीकृत संस्थांना अनुदान देताना खालील वेळापत्रकानुसार अनुदान वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.**

१) **जाहिरातीद्वारे अर्ज मागविणे :-** सांस्कृतिक कार्य संचालनालयाने प्रतिवर्षी प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस म्हणजेच एप्रिल महिन्यात अनुदान वितरीत करण्यासंदर्भात संस्थांकडून अर्ज मागविण्यासाठी सर्व जिल्हयातील प्रमुख वृत्तपत्रात व्यापक जाहिरात देण्याची कार्यवाही करावी.

२) **संस्थेने अर्ज सादर करावयाचा कालावधी :-** वृत्तपत्रातील जाहिरातीनुसार प्रत्येक आर्थिक वर्षाच्या जून महिन्याच्या अखेरपर्यंत संस्थांनी सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये अर्ज सादर करावा. त्यानंतर प्राप्त होणा-या अर्जांचा त्या आर्थिक वर्षी अनुदान देण्यासाठी विचार केला जाणार नाही. पुढील आर्थिक वर्षी अनुदानासाठी विहित मुदतीत नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे.

३) **अर्जाची छाननी :-** विहित मुदतीत प्राप्त अर्जांची छाननी समितीकडून, छाननी करुन ज्या संस्थांच्या अर्जामध्ये नियमावलीतील निकषानुसार त्रटी आढळून येतील त्या संस्थांना संधी म्हणून तुटींची पूर्तता करुन नव्याने अर्ज करण्याबाबत पत्र पाठविणे यासाठी जुलै व ऑगस्ट या २ महिन्यात ही कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

४) **तुटी पूर्ततेचा अहवाल सादर करणे :-** सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून तुटी पूर्ततेबाबत प्राप्त होणा-या पत्रानुसार त्रटीची पूर्तता करुन संस्थांनी संचालनालयाकडे सप्टेंबर अखेरपर्यंत तुटी पूर्तता अहवाल सादर करावा. त्यानंतर प्राप्त होणा-या त्रटी पूर्तता अर्जांचा त्या आर्थिक वर्षी अनुदान देण्यासाठी विचार केला जाणार नाही.

५) **छाननी समिती व अर्थसहाय्य समितीची बैठक :** संस्थांकडून प्राप्त तुटी पूर्तता अर्जांची छाननी समितीने करुन पात्र संस्थांच्या अर्जाबाबत अनुदान वितरीत करण्यासंदर्भात अर्थसहाय्य समितीची बैठक दि. ३१ ऑक्टोबर अखेरपर्यंत घेण्यात येईल.

६) **पात्र संस्थांना अनुदान वाटप करणे :-** अर्थसहाय्य समितीच्या मान्यतेने पात्र संस्थांना अनुदान वाटप करण्याबाबत ३० नोव्हेंबर अखेरपर्यंत शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

७) **नव्याने अर्ज मागविणे :-** आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस देण्यात आलेल्या जाहिरातीनुसार प्राप्त अर्जांची छाननी करुन पात्र संस्थांना अनुदान वितरीत केल्यानंतर जर अर्थसंकल्पिय तरतूद शिल्लक राहिली तर नोव्हेंबर महिन्यामध्ये नव्याने जाहिरात देऊन संस्थांकडून अर्ज मागविण्यात येतील.

**<u>समितीची रचना :-</u>**

१) सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे प्राप्त होणा-या अर्जाची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे **छाननी समिती** गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | अध्यक्ष |
| अवर सचिव (सां.का.४), सांस्कृतिक कार्य विभाग | सदस्य |
| सहसंचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य सचिव |

२) छाननी समितीने योजनेच्या निकषानुसार पात्र ठरविलेल्या संस्थांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यासाठी खालीलप्रमाणे **अर्थसहाय्य समिती** गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| मा. मंत्री (सां.का.) | अध्यक्ष |
| मा. राज्यमंत्री (सां.का) | उपाध्यक्ष |
| प्रधान सचिव (प. व सां.का.) | सदस्य |
| संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य सचिव |

संस्थांना सहाय्यक अनुदान देण्यासंदर्भात समितीचा निर्णय अंतिम असेल.

**अर्थसहाय्य देताना छाननीअंती ६ पेक्षा जास्त संस्था योजनेच्या निकषानुसार पात्र ठरत असल्यास खालील बाबीं तपासून गुणवत्तेनुसार योग्य संस्थांना अनुदान देण्यात येईल.**

१) ज्या संस्थांच्या मागील ३ आर्थिक वर्षात विविध नामांकित आणि मान्यताप्राप्त अशा स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविले आहे किंवा त्यांच्या कलावंतांनी गौरव प्राप्त केला आहे, अशा संस्था.

२) ज्या संस्थांच्या मागील ३ आर्थिक वर्षात शास्त्रीय संगीत क्षेत्रात केलेले कार्य नाविण्यपूर्ण व वैशिष्टयपूर्ण आहेत, अशा संस्था.

३) ज्या संस्थांनी राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे अशा संस्था.

४) ग्रामीण भागात, आदिवासी दुर्लक्षित भागात आणि औद्योगिक क्षेत्रात कार्यक्रम करणा-या संस्थांबाबत प्राधान्याने विचार करण्यात येईल.

**संस्थांनी शास्त्रीय संगीताचे सादरीकरण, जतन व संवर्धन करताना खालील बाबी कटाक्षाने न करण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे.**

१) जातीय किंवा धार्मिक विद्वेष उफाळून येईल किंवा बळावेल, असे कोणतेही कार्य किंवा असा कोणताही कार्यक्रम सादर करणे.

२) शासकीय धोरण, सामाजिक नितिमत्ता याच्याशी विसंगत असलेल्या बाबींचा संस्थेच्या कार्यात किंवा कार्यक्रमात समावेश करणे.

३) विशिष्ट व्यक्ती / संस्थेवर टिका करणारा कार्यक्रम करणे.

४) राजकीय वाद, वैयक्तिक स्वरुपातील हिंसाचार उद्भवेल किंवा वाढेल असे कोणतेही कार्यक्रम करणे.

या उपक्रमासाठी येणारा अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र | तपशील | अंदाज रक्कम |
|---|---|---|
| १ | ६ संस्थांच्या अनुदानाचा खर्च ( रु.२.०० लाख/प्रतिसंस्था) | रु.१२,००,०००/- |
| २ | इतर खर्च (बैठकीचा आयोजन खर्च, जाहिरात खर्च व इतर आस्थापना विषयक खर्च) | रु.५०,०००/- |
| | **एकूण खर्च** | **रु.१२,५०,०००/-** |

थोडक्यात पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या उपक्रमांच्या खर्चाचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | अंदाजे रक्कम |
|---|---|---|
| १ | भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी युवा शिष्यवृत्ती योजना | रु. १६,६८,०००/- |
| २ | पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत महोत्सव | रु.९,४८,०००/- |
| ३ | पंडीत भीमसेन जोशी जीवन गौरव पुरस्कार | रु.७,००,०००/- |
| ४ | पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत क्षेत्रातील नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान | रु.१२,५०,०००/- |
| | **एकूण रुपये** | **रु.४५,६६,०००/-** |

या योजनेचा दर ३ वर्षानंतर आढावा घेण्यात येईल.

यासाठी संचालक सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत दुय्यम अधिका-यास यासंबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदरचा खर्च हा मागणी क्र. झडेडी-२, २२०५ कला व संस्कृती, १०२ कला व संस्कृती प्रचालन, (०१) शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे, (०१) (०३) भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना (२२०५ ३३२१) - ३१ सहाय्यक अनुदान या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात येईल.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८२/१४४४, दि.३० मार्च, २०१२ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २२८/व्यय-१४ दि. १६ एप्रिल, २०१२ या प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( किशोर रा. कुलकर्णी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव , मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा. अध्यक्ष, विधानसभा, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा. सभापती, विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा. मंत्री (सांका) यांचे खाजगी सचिव
७. मा. राज्यमंत्री (सांका) यांचे खाजगी सचिव
८. सर्व मा. मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य ,मंत्रालय, मुंबई
१०. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव मंत्रालय, मुंबई
११. सर्व विभागीय आयुक्त (उपक्रम क्र.३ नुसार पुरस्कारासाठी शिफारशी पाठविण्यासंदर्भात)
१२. सर्व जिल्हाधिकारी (उपक्रम क्र.३ नुसार पुरस्कारासाठी शिफारशी पाठविण्यासंदर्भात)
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद
१७. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय
२२. महालेखापाल (महाराष्ट्र १) (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई
२३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
२४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२५. सर्व उप सचिव / अवर सचिव/ कक्ष अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
२६. निवड नस्ती, सां.का. ४

------